# राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना

जिल्हा परिषद, चंद्रपूर - व्यक्तिगत लाभाच्या योजनांचे टेम्प्लेट

## १) योजनेचे नाव

**राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना**

## २) योजनेचा उद्देश आणि लाभ

योजनेतील लाभार्थी हे संपूर्णपणे कला साहित्यिक या क्षेत्राशी निगडीत असून त्यावरील त्यांची उपजीविका अवलंबून आहे. वृद्ध कलाकारांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन जीवनमान उंचावण्यास मदत होईल अशी भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पुढील पिढीस एक आत्मविश्वास निर्माण होऊन लुप्त होत चाललेल्या राज्याच्या काही सांस्कृतिक कलाकृती यांचे जतन व संवर्धन करण्यास मदत होईल.

**कलावंतांना सर्वसाधारण एकच श्रेणी रुपये ५०००/- इतके मानधन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

• सदर मानधन लाभार्थ्यांना महिन्याला मिळेल

• प्रत्येक वर्षी नव्याने जिल्हास्तरीय समितीस कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही

• फक्त प्रतिवर्षी हयातीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील

## ४) पात्रता निकष

१) वय ५० वर्षापेक्षा जास्त (दिव्यांगांसाठी ४० वर्षे)

२) किमान १५ वर्षाचे योगदान साहित्य / कलाक्षेत्रात

३) फक्त कलेवर आधारित उपजीविका असावी

४) कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.६०,०००/- पेक्षा जास्त नसावे

५) इतर कोणत्याही राज्य / केंद्र शासनाच्या निवृत्तीवेतन योजनेत सहभागी नसावा

६) महाराष्ट्राचे रहिवासी असणे बंधनकारक

७) साहित्यिकाने फक्त लेखन / समीक्षा क्षेत्रात कार्यरत असावे

८) महिला, विधवा, अपंग, परित्यक्त यांना प्राधान्य

# ५) आवश्यक कागदपत्रे

- वयाचा दाखला
- आधार कार्ड
- उत्पन्नाचा दाखला
- रहिवासी दाखला
- प्रतिज्ञा पत्र
- पती व पत्नीचा एकत्रित फोटो (लागू असल्यास)
- बैंक तपशील - बैंक खाते क्रमांक व बँकेचा IFSC कोड
- अपंगत्व दाखला (लागू असल्यास)
- राज्य / केंद्र सरकारचे पुरस्कार प्रमाणपत्र (लागू असल्यास)
- नामांकित संस्था / व्यक्ती यांचे शिफारस पत्र (लागू असल्यास)
- विविध पुरावे

## ६) अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया

**अर्ज मिळविण्याचे ठिकाण:** जिल्हाधिकारी यांच्याकडे

अर्जदारास अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करणे बंधनकारक असेल

अर्ज फक्त ऑनलाइन पद्धतीने https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en या संकेतस्थळावर स्वीकारले जातील

अर्जदार जवळच्या सेतू केंद्रावर किंवा इतर उपलब्ध माहिती तंत्रज्ञान प्रणालीद्वारे अर्ज सादर करू शकतात

## ९) जबाबदार अधिकारी व संपर्क माहिती

**योजना समन्वयक:**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, चंद्रपूर

**फोन नंबर:**
०७१७२-२५०६६०

**ई-मेल:**
dyceopzpchandrapur@gmail.com

**तालुका योजना अधिकारी:**

गट विकास अधिकारी

**कार्यालयीन पत्ता:**

पंचायत समिती (सर्व)

## १०) शासन निर्णय

### पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे शासन निर्णय

क्रमांक: वृकमा ४३२१ (१५) /प्र.क्र.१४५/सां.का.४

दिनांक: १६ मार्च, २०२४

© २०२४ जिल्हा परिषद, चंद्रपूर - सर्व हक्क राखीव